महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
माहितीचा अधिकार
## सहायक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, परभणी
गोरे बिल्डिंग, शिवाजी नगर, परभणी - ४३१ ४०१
ईमेल: ad.parbhani@mahalfa.in website: www.mahalfa.maharashtra.gov.in दुरध्वनी क्रमाक: ०२४५२-२२१३४०

जा.क्र.स्था-18/ब/परभणी/भांडार/कंत्राटी वाहनचालक/ 1289/2019 दिनांक : 16 DEC 2019

प्रति,
**सहायक संचालक (संगणक),**
स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय,
महाराष्ट्र राज्य,
नवी मुंबई.

**विषय : बाहययंत्रणेद्वारे वाहनचालकांच्या सेवा घेण्याबाबत.**
**(दिनांक 01.04.2020 ते दिनांक 28.02.2021)**

संदर्भ : मा.संचालनालय, स्थानिक निधी लेखापरीक्षा, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक स्था-18/ब/बाहययंत्रणा/कंत्राटी कर्मचारी/न.क्र.60(5)/आस्था-5/384, दिनांक 22.02.2018

उपरोक्त विषयी, उदयोग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक : भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-III/उदयोग-4, दिनांक 01.12.2016 मधील नियम पुस्तिका प्रकरण 4.2 अन्वये मागविण्यात येणाऱ्या दरपत्रकास विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दी देणे बाबत सुचना आहेत.

त्या अनुषंगाने, प्रस्तुत कार्यालयाचे वाहन क्रमांक MH-22-D-7229 साठी कंत्राटी वाहनचालक पदाची कामे करण्यासाठी मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याकरिताच्या दरपत्रकास विभागाच्या संकेतस्थळावर **प्रसिध्दी** देण्यात **यावी** हि विनंती.

सहपत्र : दरपत्रक / निविदा.

( अर्चना नरवडे )
**सहायक संचालक,**
स्थानिक निधी लेखापरीक्षा, परभणी

प्रत,

1. **मा.सहसंचालक**, स्थानिक निधी लेखापरीक्षा, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
2. **सहायक संचालक (प्रशासन)**, संचालनालय स्थानिक निधी लेखापरीक्षा, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई **यांना** माहिती व पुढील कार्यवाहीस्तव सादर.

— स्वा —
**सहायक संचालक,**
स्थानिक निधी लेखापरीक्षा, **परभणी**

माहितीचा अधिकार

महाराष्ट्र शासन

वित्त विभाग

## सहायक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, परभणी

गोरे बिल्डिंग, शिवाजी नगर, परभणी - ४३१ ४०१

ईमेल: ad.parbhani@mahalfa.in website: www.mahalfa.maharashtra.gov.in दुरध्वनी क्रमांक: ०२४५२-२२१३४०

जा.क्र.स्था-18/ब/परभणी/भांडार/कंत्राटी वाहनचालक/ 1288/2019 दिनांक : 16 DEC 2019

प्रति,

-----------------------------------------

-----------------------------------------

-----------------------------------------

**विषय : बाह्ययंत्रणेद्वारे वाहनचालकांच्या सेवा घेण्याबाबत.**
**(दिनांक 01.04.2020 ते दिनांक 28.02.2021)**

संदर्भ : मा.संचालनालय, स्थानिक निधी लेखापरीक्षा, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक स्था-18/ब/बाह्ययंत्रणा/कंत्राटी कर्मचारी/न.क्र.60(5)/आस्था-5/384, दिनांक 22.02.2018

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, या कार्यालयाचे वाहन क्रमांक MH-22-D-7229 साठी कंत्राटी पध्दतीने वाहनचालक पदाच्या सेवेची आवश्यकता आहे. त्यानुसार कंत्राटी पध्दतीने एक वाहन चालक उपलब्ध करून देण्याकरिता सोबत जोडलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहुन दरपत्रक या कार्यालयास दिनांक 27.12.2019 रोजी संध्याकाळी 05:00 वाजेपर्यंत सादर करण्यात यावेत. विलंबाने प्राप्त होणाऱ्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

सहपत्र : दरपत्रक / निविदा.

( अर्चना नरवडे )
**सहायक संचालक,**
स्थानिक निधी लेखापरीक्षा, परभणी

प्रतिलिपी,

**कार्यालयीन नोटीस बोर्डवर.**

# वाहन चालक पदाची कामे करण्यासाठी मनुष्यबळ पुरविण्यासाठी निविदा / दरपत्रक

सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, कार्यालय --परभणी---------- यांना कंत्राटीपध्दतीने वाहन चालक पदाची सेवा पुरविणाऱ्या नोंदणीकृत संस्था / बेरोजगार संस्थांकडून मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याकरिता निविदा / दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

## निविदा / दरपत्रकाच्या सर्वसाधारण अटी व शर्ती :- (General Terms and Conditons) :-

१. **पक्षकार** : करारनाम्याचे पक्षकार हे **कंत्राटदार** (ज्यांना काम सोपवीले आहे) आणि **सहाय्यक संचालक,** स्थानिक निधी लेखापरीक्षा, कार्यालय जिल्हा --परभणी--------हे राहतील.

२. पुरविण्यात येणाऱ्या वाहन चालकाची **शैक्षणिक पात्रता व इतर तपशिल** खालील प्रमाणे असेल :

१) वाहन चालक किमान चौथी इयत्ता उत्तीर्ण असावा.त्याला मराठी / हिंदी भाषा लिहीता, वाचता व बोलता येणे आवश्यक आहे.

२) नुतनिकरण अद्यावत असलेला जीप, कार व अवजड वाहन चालवण्याचा मोटार वाहन कायद्यांतर्गत आवश्यक असलेला वाहन चालविण्याचा परवाना वाहन चालकाकडे असणे आवश्यक आहे.

३) वाहन चालकाचे ओळखपत्र आधारकार्ड, निवडणुककार्ड, पॅन कार्ड इत्यादी पैकी एक त्याच्याजवळ असावे.

४) वाहन चालकाला वाहन चालविण्याचा कमीत कमी ३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

५) वाहन चालकाचे वय ५८ वर्षापेक्षा जास्त व १८ वर्षा पेक्षा कमी नसावे.

६) वाहन चालकाच्या चारित्र्याची तपासणी राजपत्रित अधिकाऱ्याकडून करुन घ्यावी. कंत्राटदार संस्थेने वाहन चालकाचे पोलीस पडताळणीसह ओळखपत्र द्यावे.

७) वाहन चालकास वाहन दुरुस्तीचे जुजबी ज्ञान असणे आवश्यक आहे.

८) वाहन चालक शारिरीकदृष्ट्या सक्षम असावा. त्याची वागणुक विनम्रतेची आणि सहकार्याची असावी.

९) वाहन चालकाची वैयक्तीक माहिती पुरविणे आवश्यक राहील. उदा. शैक्षणिक अर्हता, कायम व सद्याचा पत्ता, नमुना स्वाक्षरी व अलीकडे काढलेला पासपोर्ट साईज फोटोग्राफ.

३. **कंत्राटी वाहन चालकाची जबाबदारी :**

१) प्रतिदिन ९ तास काम करणे आवश्यक आहे.

२) सहाय्यक संचालक हे ज्या वेळी कामावर बोलावतील त्यावेळस तत्परतेने कामावर यावे लागेल.

३) आवश्यता भासल्यास सुट्टीच्या दिवशीही कामावर बोलावण्याचा अधिकार सहाय्यक संचालक यांना असेल. सुट्टीच्या दिवशी केलेल्या कामाचा मोबादला म्हणुन वेगळे पारिश्रमिक वा भत्ते मागता येणार नाहीत.

४) वाहन स्वच्छ व सुस्थितीत ठेवणे ही कंत्राटी वाहन चालकाची जबाबदारी असेल.

५) कंत्राटी वाहन चालकाचे कार्यक्षेत्र हे संबंधित जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्र असेल. शासकीय कामानिमित्त आवश्यकता भासल्यास जिल्ह्याबाहेरील क्षेत्रात वाहन चालवावे लागेल.

## ४. वाहन चालकाला अनुज्ञेय असणारे पारिश्रमिक, भत्ते व त्यांचे प्रदान :

१) कंत्राटदाराने / पुरवठादाराने त्याच्या कामगारास अदा करावयाच्या **पारिश्रमिकाची रक्कम** ही किमान वेतन कायद्यातील तरतुदीनुसार कंत्राटदाराकडून / पुरवठादाराकडून कंत्राटी कामगाराला देय असलेले किमान वेतन + विशेष भत्ता + बोनस + राज्य कामगार विमा योजना + कर्मचारी भविष्य निर्वाह निधीची रक्कम इत्यादी मिळून होणारी रक्कम यापेक्षा कमी असणार नाही. कंत्राटदाराने / पुरवठादराने त्याच्या प्रशासकीय सेवेचा (Administrative Service Charges) स्वतंत्रपणे दर्शवावे.

२) **अतिकालीक भत्ता** रु.४०/- प्रती तास : अतिकालीक भत्ता हा दिवसाच्या ९ तासाचे काम संपल्यावर १ तास झाल्यानंतर म्हणजेच १० तासानंतर लागु राहील.

३) महिना संपल्यानंतर पुढील महिन्याच्या पहिल्या आठवडयात कंत्राटदाराने / पुरवठादाराने उपस्थिती प्रमाणपत्राच्या प्रतीसह देयक सादर करावे. देयकपारीत झाल्यानंतर रक्कम प्रदान करण्यात येईल.

४) वाहन चालकाचे मासिक पारिश्रमिक कंत्राटदाराने / पुरवठादाराने प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत संबंधित वाहन चालकाच्या बँक खात्यावर रेखांकित धनादेशाद्वारे ( Account Payee Cross Cheque) जमा करणे आवश्यक राहील.

५) कंत्राटदाराने / पुरवठादाराने कंत्राटी वाहन चालकाला दिलेल्या पारिश्रमिकाच्या / इतर भत्त्यांच्या धनादेशाची छायांकीत प्रत दर महा सादर केल्याशिवाय कंत्राटदाराला / पुरवठादाराला पुढील महिन्याचे देयक अदा केले जाणार नाही.

६) कंत्राटदाराने / पुरवठादाराने कंत्राटी वाहन चालकांना किमान वेतन कायद्यातील तरतूदीपेक्षा कमी वेतन दिल्यास संबंधित कंत्राटदार / पुरवठादार किमान वेतन कायद्यातील तरतूदीप्रमाणे कारवाईस पात्र असेल.

७) कंत्राटदारास / पुरवठादारास रक्कम अदा करतांना आयकर कायद्यातील तरतूदीनूसार आयकराची रक्कम कपात करुन उर्वरित रक्कम अदा केली जाईल.

**५. नुकसानीबाबत कंत्राटदाराचे / पुरवठादाराचे दायित्व :**

१) कंत्राटदाराने / पुरवठादाराने नेमलेल्या कंत्राटी वाहन चालकास दैनंदिन काम करतांना काही इजा व हानी झाल्यास संबंधितास नुकसान भरपाईची रक्कम कंत्राटदार / पुरवठादार यांना अदा करावी लागेल. सदर वाहन चालकाच्या सेवेचे तसेच त्यास झालेल्या इजा वा नुकसान भरपाईचे कोणतेही दायित्व शासनावर असणार नाही. त्याची जबाबदारी कंत्राटदार / पुरवठादार यांची असेल.

२) कंत्राटी वाहन चालकास नियमित शासकीय कर्मचाऱ्यांचे नियम / अटी व शर्ती लागु असणार नाहीत. नियमित कर्मचाऱ्यांप्रमाणे त्यांना कोणतेही वेतन, भत्ते व अनुषंगिक लाभ अनुज्ञेय असणार नाहीत व त्यांच्या सेवेचे कोणतेही दायित्व शासनावर असणार नाही.

३) कंत्राटी वाहन चालकाकडून होणाऱ्या शासकीय मालमत्तेच्या कोणत्याही नुकसानीची जबाबदारी संबंधित कंत्राटदार / पुरवठादार यांच्यावर राहील.

४) कंत्राटदाराकडुन / पुरवठादाराकडून करारनाम्यातील कोणत्याही अटीचे उल्लंघन झाल्यास किंवा विहित वेळेत वाहन चालक उपलब्ध करुन न दिल्यामुळे अन्य मार्गाने वाहन चालक उपलब्ध करुन घेतल्यामुळे त्यास काही पारिश्रमिक द्यावे लागल्यास ती सर्व रक्कम कंत्राटदाराच्या / पुरवठादाराच्या प्रलंबित देयकातुन अथवा सुरक्षा ठेवीतुन कपात करण्यात येईल.

५) कंत्राटी वाहन चालकाच्या अनुपस्थितीच्या दिवशी कंत्राटदाराने / पुरवठादाराने पर्यायी व्यवस्था करुन दिली पाहीजे.

**६. निविदे संबंधिच्या अटी व शर्ती :**

१) निविदा दोन लिफाफा पध्दतीने सादर कराव्या लागतील. तांत्रिक निविदा व दराचा लिफाफा.

तांत्रिक निविदेमध्ये खालील कागदपत्रे आवश्यक असतील :

अ) दुकाने व संस्था अधिनियम अंतर्गत किंवा सहकारी संस्था नोंदणी झालेले प्रमाणपत्र अथवा शासनाच्या कोणत्याही विभागाकडे नोंदणी केलेले नोंदणी प्रमाणपत्र.

ब) निविदेच्या अंतिम तारखेपर्यंत आयकर भरल्यासंबधिचे आयकर प्रमाणपत्र व आयकर विभागाकडे नोंदणी केलेले पॅन कार्ड.

क) कामगार कायद्यातील तरतुदीनुसार नोंदणी आवश्यक असल्यास कामगार कायद्यांतर्गत नोंदणी प्रमाणपत्र.

ड) व्यवसाय कर नोंदणी प्रमाणपत्र.

इ) कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कायद्यातील तरतुदीनुसार नोंदणी आवश्यक असल्यास कर्मचारी भविष्य निर्वाह निधी नोंदणी प्रमाणपत्र.

ई) अनामत रकमेचा धनाकर्ष.

२) निविदा / दरपत्रासोबत अनामत ठेव म्हणुन रु.५,०००/- चा धनाकर्ष ( जिल्ह्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणी प्रदेय असणारा राष्ट्रीयकृत बँकेचा ) सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा जिल्हा- परभणी --यांचे नांवे देण्यात यावा.

३) कंत्राटदाराने / पुरवठादाराने नमुद केलेले दर हे दरपत्रके उघडण्याच्या तारखेपासून ९० दिवसांच्या कालावधीपर्यंत वैध / विधीग्राह्य असतील.

४) दरपत्रके शक्य झाल्यास विहीत केलेल्या दिनांकास उघडण्यात येतील. तांत्रिक दरपत्रकामध्ये पात्र ठरलेल्या पुरवठादाराचेच लिफाफे उघडण्यात येतील.

५) तांत्रिक दरपत्रक उघडल्यानंतर दरासंबंधीचे लिफाफे उघडण्यास काही अडचणी आल्यास दरपत्रकाचा लिफाफा उघडला जाणार नाही. किमान ३ वैध दरपत्रके असतील तरच दराचा लिफाफा उघडण्यात येईल. त्यातुन पात्र ठरलेल्या कंत्राटदाराचे / पुरवठादाराचे न्युनतम किमतीचे दर स्विकृत करण्यात येतील.

६) प्राप्त झालेले दर हे बाजारातील प्रचलित दरापेक्षा अवास्तव वा जास्त असणार नाहीत.

७) पात्र कंत्राटदाराने / पुरवठादाराने कामाचे आदेश देण्यापुर्वी रु.१००/- चे मुद्रांकावर करारनामा करुन देणे आवश्यक राहील.

८) निविदा मान्य झालेल्या कंत्राटदारास / पुरवठादारास तात्काळ सुरक्षा ठेव (Performance Security) रु.१०,०००/- चा धनाकर्ष ( जिल्ह्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणी प्रदेय असणारा राष्ट्रीयकृत बँकेचा ) सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा जिल्हा परभणी --यांचे नांवे द्यावा लागेल. करारनाम्याचा कालावधी पुर्ण झाल्यानंतर अथवा करारनामा संपुष्टात आल्यानंतर सदर रक्कम मुक्त करण्यात येईल.

९) कंत्राटदाराकडून / पुरवठादाराकडून करारनाम्यातील कोणत्याही अटीचे उल्लंघन झाल्यास कामाचे आदेश रद्द करण्यात येतील. व त्याला कोणतीही रक्कम प्रदेय राहणार नाही. जमा केलेल्या सुरक्षा ठेवीची रक्कम जप्त केली जाईल.

१०) कंत्राटदार / पुरवठादाराचे मान्य दर हे कार्यारंभ आदेश दिल्याच्या तारखेपासून ११ महिन्यांसाठी लागु राहतील. दरकराराच्या कालावधीत कोणतीही दरवाढ मंजुर केली जाणार नाही.

११) सहाय्यक संचालक यांना कोणत्याही वेळी कोणतेही कारण न दर्शविता निविदाधारकास १ महिन्याची आगाऊ नोटीस देऊन करारनामा रद्द करण्याचा / संपुष्टात आणण्याचा अधिकार असेल.

# निविदा / दरपत्रक प्रपत्र

कार्यालय सहायक संचालक स्थानिक निधी लेखा परभणी

पुरवठादाराचे नांवः

| अ.क्र. | बाब | कुशल कामगारासाठी दर (प्रतिमाह) रुपयामध्ये |
|---|---|---|
| १ | मुळ वेतन Basic Pay | |
| २ | विशेष भत्ता (Special Allowance) | |
| ३ | कामगार कायद्यातील तरतुदीनुसार भरावयाच्या अनिवार्य रक्कम. जसे कर्मचारी भविष्य निर्वाह निधी, कर्मचारी राज्य विमा योजना, निवृत्ती वेतन निधी, कर्मचारी कल्याण निधी इत्यादी. | |
| ४ | कंत्राटदार/पुरवठादाराचे प्रशासनिक सेवा खर्च (Firm`s Administrative Service Charges. | |
| | एकुण | |

ठिकाण :

स्वाक्षरी

दिनांक :

वरील पैकी बाब क्रमांक ०१ व ०२ चे संदर्भात राज्य शासनाने कुशल कामगारासाठी निश्चीत केलेल्या अद्यावत अस्तित्वात असलेल्या दरांची प्रत जोडणे आवश्यक राहील. अ.क्र.३ चे बाबतीत संबधीत कायद्यात तरतुदीनुसार दिलेले दराचे आदेश जोडणे आवश्यक आहे.